<u>नियमित दिवाणी दावा क्रमांक १६५/२०२३ मधील निशाणी क्र. २८ वरील आदेश</u>

१. प्रस्तुतचा अर्ज, वादी यांनी प्रतिवादीचे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी दिला आहे. वादीच्या म्हणण्यानुसार, प्रतिवादी महादेव शिदु घार्गे हे दावा चालू असताना दिनांक १९.०८.२०२३ रोजी मयत झाले आहेत. ते मयत झाले त्यावेळी त्यांना अर्जामध्ये नमूद असणारे व्यक्ती हे हिंदू वारसा कायद्याप्रमाणे कायदेशीर वारस आहेत. सबब, प्रतिवादीचे नावापुढे मयत वारस असे लिहून त्याप्रमाणे दुरुस्ती करुन अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे वारसांची नावे नमूद करण्याची व तशी दुरुस्ती करण्याची वादीस परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

२. प्रतिवादी यांनी सदर अर्जास निशाणी क्र. ३३ हरकत घेतली. प्रतिवादी यांच्या म्हणण्यानुसार, प्रतिवादी क्र. १ ते ३ यांची नावे चुकीची नमूद केलेली आहेत. प्रतिवादी मयत झाल्याची पुरशिस अभिलेखावर दाखल केली होती. प्रतिवादीचे वारस अभिलेखावर घेण्यास का उशीर झाला याचे कारण नमूद नाही. वादी यांना प्रतिवादी मयत झाल्याची बाब सुरुवातीपासूनच माहित होती. अर्जामध्ये नमूद केलेले कारण खोटे आहे. सबब अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा.

३. प्रतिपक्षांच्या कथनांवरुन माझे समोर खालील मुद्दे उपस्थित होतात. मी त्यावरील माझे निष्कर्ष कारणांस त्यापुढे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादी मागणी केल्यानुसार वादी क्र. २ चे वारस दाव्यात दुरुस्तीने अभिलेखावर घेण्यास पात्र आहे काय ? | होय. |
| २ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>का र ण मी मां सा</u>

४. वादी व प्रतिवादी यांचे वकीलांचा युक्तीवाद ऐकला. वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादीविरुध्द वादीच्या दावा मिळकतीमधील कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करु नये व निरंतर ताकीदिसाठी दाखल केला आहे. प्रतिवादी महादेव शिदु घार्गे हे दावा चालू असताना दिनांक १९.०८.२०२३ रोजी मयत झाले आहेत. ते मयत झाले त्यावेळी त्यांना हिंदू वारसा कायद्याप्रमाणे अर्जामध्ये नमूदच कायदेशीर वारस होते व आहेत. प्रतिवादीचे वारसांना त्यांचे पश्चात दावा चालविण्याचा हक्क असल्याने दावा गुणदोषावर चालणेसाठी प्रतिवादीचे वारस अभिलेखावर येणे आवश्यक आहे. सदर दुरुस्ती मंजुर केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही अगर दाव्याचे स्वरुप बदलणार नाही. सबब मुद्दा नं.१ होकारार्थी देऊन मुद्दा नं.२ साठी खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आ दे श</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादीचे वारस सदर दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. १अ ते १क म्हणून अभिलेखावर घेण्यात येत आहे. सदर दुरुस्ती ही आजपासून १४ दिवसाचे आत करावयाची आहे.

३. वादीने योग्य त्या दुरुस्तीसह दाव्याची प्रत मुदतीत दाखल करावी.

VAIBHAV BAJRANG GHADAGE
Digitally signed by VAIBHAV BAJRANG GHADAGE
Date: 2025.10.28 17:32:09 +0530

( व्ही. बी. घाडगे )
दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, वडूज.

दिनांकः- २८.१०.२०२५